**Mata 31.03.20**

# चोरून गुटखा विक्री करणारा ताब्यात

पुणे : गुटख्याची चोरून विक्री करणाऱ्याला पकडून पोलिसांनी त्याच्याकडून पाच हजार ८७२ रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. गुन्हे शाखेच्या युनिट ३ च्या पथकाने ही कामगिरी केली.

पर्वती, शिवदर्शन येथील जोगेश्वरी प्रोव्हिजन स्टोअरमध्ये बेकायदा पद्धतीने गुटख्याची विक्री केली जात असल्याची माहिती युनिट ३ चे पोलिस हवालदार संतोष क्षीरसागर, पोलिस नाईक अतुल साठे यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांच्या पथकाने अन्न आणि औषध प्रशासन विभागातील अधिकारी यांच्या मदतीने या दुकानावर छापा मारला. त्या वेळी आरएमडी गुटखा, विमल गुटखा, पान मसाला, असा माल जप्त करण्यात आला. दुकानमालक जगदीश हगुडे (वय ३२, रा. शिवदर्शन, पर्वती) यांच्या विरोधात गुन्हा दत्तवाडी पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हे शाखेच्या युनिट ३ चे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र मोकाशी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक भालचंद्र ढवळे, उपनिरीक्षक किशोर शिंदे, तेहिदास लवांडे, संदीप राठोड यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

गावठी कट्टा कोंढव्यात जप्त

कोंढव्यातील चंदन चोरट्याकडून पोलिसांनी गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे जप्त केली. विष्णू देविदास कसबे (वय २३, रा. शिवनेरीनगर, कोंढवा खुर्द) असे चोरट्याचे नाव आहे.

क्राइम डायरी

कोंढवा पोलिस स्टेशनच्या तपास पथकातील पोलिस नाईक कौस्तुभ जाधव यांना मिळालेल्या बातमीनुसार पोलिसांनी शिवनेरीनगर येथे जाऊन कसबे याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे १० हजार रुपये किमतीचा गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे सापडली, अशी माहिती पोलिसांनी दिली.

कसबेविरुद्ध २०१८ मध्ये एक चंदन चोरीचा गुन्हा दाखल आहे. पोलिस उपनिरीक्षक संतोष शिंदे, सहायक फौजदार इकबाल शेख यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

**Sakal 22.03.20**

# मंगलदास बांदल यांना खंडणीप्रकरणी अटक

पुणे, ता. २१ : सराफी व्यावसायिकाकडे ५० कोटी रुपयांची खंडणी मागण्याप्रकरणी जिल्हा परिषदेच्या बांधकाम व आरोग्य समितीचे माजी सभापती मंगलदास बांदल यांना शनिवारी रात्री पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. बांदल यांच्या कोंढवा येथील घरातून पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. खंडणी प्रकरणात नाव पुढे आल्यानंतर बांदल यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्ष पदावरून पक्षाने काही दिवसांपूर्वीच हकालपट्टी केली होती.

शहरातील एका नामांकित सराफी व्यावसायिकाशी संबंधित व्हिडिओ क्लिप तयार करून तिघांनी त्यांच्याकडे ५० कोटी रुपयांची मागणी केली होती; तसेच पिस्तुलाचा धाक दाखवून व बदनामीची धमकी देऊन त्यांच्याकडे खंडणी मागितली होती. याप्रकरणी पोलिसांनी फिर्यादीकडे पूर्वी बॉडीगार्ड म्हणून काम करणारा आशिष पवार, घरकामगार रमेश पवार व बांधकाम व्यावसायिक रूपेश चौधरी यांना अटक केली होती. त्यानंतर फिर्यादीच्या कारचालकासही अटक केली होती. दरम्यान, फिर्यादीच्या जबाबामध्ये बांदल यांच्या नावाचा चार वेळा उल्लेख आला होता. त्यामध्ये बांदल यांनी फिर्यादीची भेट घेऊन 'माझ्यावतीने रूपेश चौधरी हा सर्व काम पाहील' असे म्हटल्याचे नमूद केले होते; तर रूपेश चौधरी हा या प्रकरणातील मुख्य आरोपी असल्याने बांदल यांच्याभोवती संशयाची सुई फिरत होती. दरम्यान, या प्रकरणामध्ये बांदल यांना पुणे पोलिसांनी चौकशीसाठी बोलावले. त्यांच्याकडे आठवडाभर कसून चौकशी केली. यामध्ये बांदल यांचा सहभाग असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर त्यांना शनिवारी रात्री सहायक पोलिस आयुक्त (गुन्हे) शिवाजी पवार यांच्या पथकाने अटक केली.

> खंडणी प्रकरणामध्ये मंगलदास बांदल यांचा जबाब नोंदविण्यात आला होता. त्यानंतर त्यांची पडताळणी करून व उपलब्ध पुराव्यांच्या आधारे बांदल यांचा या प्रकरणात सहभाग असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर त्यास अटक केली.
> - बच्चन सिंग,
> पोलिस उपायुक्त (गुन्हे)

**Samana 22.03.20**

# चरस बाळगणारा जेरबंद

## ▌३ लाख ६० हजारांचा ऐवज जप्त

पुणे, दि. २१ (प्रतिनिधी) – येरवड्यातील लक्ष्मीनगरमध्ये ३५ हजारांचे ११२ ग्रॅम चरस बाळगणाऱ्याला अंमली पदार्थ विरोधी पथकाने जेरबंद केले. त्याच्याकडून दीड लाखाची रोकड, दुचाकी, १५ मोबाईल असा ३ लाख ६० हजारांचा ऐवज जप्त करण्यात आला.

विकास आबा पोंगडवाले (वय ४२, रा. लक्ष्मीनगर, येरवडा) असे जेरबंद केलेल्याचे नाव आहे.

येरवड्यातील पर्णकुटीच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर विकास चरस घेऊन थांबल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून विकासला ताब्यात घेतले. झडती घेतली असता, त्याच्याकडे ३५ हजार रुपये किमतीचे ११२ ग्रॅम चरस मिळून आले. दीड लाखाची रोकड, १५ मोबाईल, दुचाकी असा ३ लाख ६० हजारांचा ऐवज जप्त केला. ही कामगिरी पोलीस उपायुक्त बच्चन सिंह, सहायक पोलीस आयुक्त विजय चौधरी, पोलीस उपनिरीक्षक सुभाष ताागड, अर्जुन दिवेकर, अविनाश शिंदे, मोहन साळवी, राहुल जोशी, मीना पिंजण, मनोज साळुंखे, अमित छडीदार, सचिन चंदन, योगेश मोहिते यांच्या पथकाने केली.

**Prabhat 23.03.20**

# चरस बाळगणाऱ्या युवकाला अटक

पुणे, दि. २२ - बेकायदेशीरपणे चरस बाळगणाऱ्याला कोरेगाव पार्क पोलिसांनी अटक केली. त्याच्यकडोन ३५ हजार रुपये किंमतीचा ११२ ग्रॅम चरस, १५ मोबाईल आणि होंडा ॲक्टीव्हा गाडी असा ३ लाख ५९ हजार ५९० रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. विकास आबा पोंगडवाले (वय ४२, रा. येरवडा) असे त्याचे नाव आहे. याबाबत अंमली पदार्थ व खंडणी विरोधी पथक पूर्व विभागाचे सहायक पोलीस उपनिरीक्षक मोहन प्रभाकर साळवी यांनी फिर्याद दिली आहे. येरवड्याकडून सर्किट हाऊसकडे जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावर ही कारवाई करण्यात आली.

**Pudhari 20.03.20**

# गावठी कट्टा बाळगल्याप्रकरणी सराइताला अटक

## फरासखाना तपास पथकाची कामगिरी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

गावठी कट्टा बाळगल्याप्रकरणी एका सराइताला फरासखाना पोलिसांनी अटक केली. अभिषेक विष्णू मोकाशी (रा. पुरंदर) असे अटक केलेल्याचे नाव आहे.



या वेळी त्याच्या ताब्यातून दोन गावठी कट्टे व पाच जिवंत काडतुसे असा ६० हजारांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. आरोपीविरुद्ध बेकायदा शस्त्र बाळगल्याप्रकरणी आर्म ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे.

फरासखाना पोलिसांचे एक पथक हद्दीत गस्तीवर असताना कर्मचारी शंकर कुंभार यांना गोपनीय माहिती मिळाली की एक व्यक्ती पवळे चौक परिसरात संशयितरीत्या थांबल आहे. त्यानुसार सापळा रचू त्याला ताब्यात घेऊन चौकश करत, त्याची अंगझडती घेतल असता त्याच्याकडे दोन गावठ कट्टे मिळून आले. ही कामगिर निरीक्षक जगन्नाथ कळसक यांच्या मार्गदर्शनाखाल उपनिरीक्षक प्रमोद हंबीर, यशपाल सुर्यवंशी कर्मचारी अमोल सरडे विकास बोऱ्हाडे, खुटवड, मयू भोकरे यांच्या पथकाने केली.

**Loksatta 23.04.20**

# टाळेबंदीत जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई

**पुणे :** टाळेबंदीत जुगार खेळणाऱ्या सहाजणांना हडपसर पोलिसांनी पकडले. या कारवाईत पोलिसांनी त्यांच्याकडून पत्ते तसेच साडेसहा हजार रुपयांची रोकड जप्त केली.

याप्रकरणी रामदास बाबासाहेब कांबळे, संजय शिवाजी सूर्यवंशी, ज्ञानेश्वर राजेंद्र कामठे, विनायक यशवंत अलाहाबादे, नारायण गणा ढावरे, यशवंत अरुण बनसोडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

शहरात संचारबंदीचे आदेश लागू असताना हडपसर भागात काहीजण जुगार खेळत असल्याची माहिती हडपसर पोलिसांना मिळाली. हडपसर भागात सर्वजण जुगार खेळत होते. त्यांच्या विरोधातगुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार संतोष जोशी यांनी याबाबत हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून सहाय्यक फौजदार घोलप तपास करत आहेत.

**Indian Exoress 28.04.20**

# Cops raid shop selling foreign cigarettes, tobacco items

**EXPRESS NEWS SERVICE**
PUNE, APRIL 27

POLICE HAVE booked the owner of a fast food shop for allegedly selling foreign brand cigarettes and other tobacco products despite restrictions during the nationwide lockdown in the wake of the coronavirus outbreak.

Police have identified the accused as Amarjit Sandhu (25), a resident of Viman Nagar. Acting on a tip-off, a team of the Crime Branch of Pune Police raided his fast food shop on Saturday and found that he was selling foreign brand cigarettes and other tobacco products.

Police seized material worth Rs 2.25 lakh and registered a case against Sandhu at the Yerwada police station under relevant sections of the Indian Penal Code, National Disaster Management Act, Epidemic Diseases Act and Cigarettes and Other Tobacco Products (Prohibition of Advertisement and Regulation of Trade and Commerce, Production, Supply and Distribution) Act.

In another case, a Crime Branch team on Saturday nabbed a wine shop owner for selling liquor from his bungalow. Police have identified the accused as Vikas Akkale (45), a resident of Mahalakshmi bungalow in Kharadi area.

Police said Akkale was selling foreign and countrymade liquor from his wine shop at his residence to customers known to him at higher prices.

## Man held with 406 gm marijuana

Police arrested a 27-year-old, identified as Akshay Chavan, for the alleged possession of 406 gm of marijuana worth Rs 8,120 in Yerwada area on April 24.

He has been booked under relevant sections of the Narcotic Drugs and Psychotropic Substances Act.

Also, police have booked two persons, identified as Ashok Chunnilal Mali (32) of Bhagyalakshmi Supermarket in Pune Camp area and Shravankumar Prajapati (35) of New Prince Super Shoppe in Baner area, for allegedly selling grocery products at higher prices.

**Lokmat 21.04.20**

# किराणा दुकानदाराला खंडणी मागणाऱ्या तोतया ग्राहक मंच अधिकाऱ्यास अटक

पुणे : भारत सरकारच्या ग्राहक मंचचा अधिकारी असल्याचा बनाव करुन दुकानदाराकडून खंडणी उकळणाऱ्या तोतयास खंडणीविरोधी पथकाने अटक केली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे अगोदर तक्रार आल्यावर त्यांनी पडताळणी केली. त्यात तो सरकारी अधिकारी नसल्याचे त्याची माहिती शहर पोलिसांना दिली होती.

निशिकांत रामचंद्र धुमाळ (वय ४५, रा. पाषाण) असे त्याचे नाव आहे. त्याने त्यांच्या चारचाकी गाडीला भारत सरकार असा बोर्ड लावून मी ग्राहक मंचाचा अधिकारी असल्याचे सांगत होता. त्याने विजया लक्ष्मी सुपर मार्केट या दुकानातूनही अशाच प्रकारे धमकावून २० हजार रुपये घेतल्याचे निष्पन्न झाले आहे.

धुमाळ हा धनश्री सुपर मार्केट या दुकानात गेला होता. दुकानाचे मालक मांगीलाल तानाजी चौधरी यांना, मी ग्राहक मंचाचा अधिकारी आहे, असे सांगून, तुम्ही चढ्या दराने मालाची विक्री करता व तुम्ही बिल देत नाही. तुमचे दुकान सील करु. तुम्हाला दंड भरावा लागेल, अशी धमकी दिली. कारवाई न करण्यासाठी सव्वा लाख रुपयांची मागणी केली. त्यावर चौधरी यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे याची तक्रार केली. त्यांनी या तक्रारीच पडताळणी केली. तेव्हा त्यात धुमाळ याने तडजोड करुन ३० हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य केले. पडताळणीत धुमाळ हा लोकसेवक नसल्याचे स्पष्ट झाले. तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पुणे शहर पोलिसांकडे पाठविली.

गुन्हे शाखेतील खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते व उपनिरीक्षक महाडिक, हवालदार मगर, गुरव, पोलीस नाईक मंगेश पवार यांनी धुमाळ याला ताब्यात घेतले.

**Lokmat 04.04.20**

# किराणा व्यापाऱ्यांवर 'पोलिसांचा वॉच'

## किरकोळ व्यापारी : अन्नधान्य वितरण विभागाच्या पथकाची मोहीम

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : महिन्याच्या सुरुवातीला संपूर्ण महिन्याभराचा किराणा सामान भरण्याची वर्षानुवर्षांची सवय असलेल्या नागरिकांना लॉकडाऊनमुळे वस्तूंचा तुटवडा जाणवतो आहे. त्याचा गैरफायदा घेऊन भरमसाट दराने किराणा माल विकणाऱ्या किरकोळ व्यापाऱ्यांवर गुन्हे शाखा व अन्न धान्य वितरण विभागाच्या पथकांनी धडक कारवाई सुरु केली आहे.

विविध भागांत चढ्या दराने किराणा विकणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करत आहे. अन्नधान्य विभाग व पोलिसांना बाजार समितीकडून सध्या असलेल्या किराणा मालांच्या दरांची यादी मिळाली. दीड पट ते दुप्पट भावाने विक्री करत असल्याचे शहरात दिसून येत असून, अशा दुकानदारांवर कारवाईचे आदेश वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

बाणेर येथील पंचरत्न सुपर मार्केटमध्ये जादा दराने विक्रीप्रकरणी कारवाई केली. दुकानदार पन्नाराम पुनाजी चौधरी (वय ४३) याच्याविरुद्ध चतु:शृंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ते शेंगदाणे १८० रुपये किलो, तूरडाळ १६०, मूगडाळ १५५, चना डाळ १४०, खोबरे २८०, शाबुदाणा १३५, साखर ४८ रुपये किलो भावाने विकली जात होती. खडकी बाजार येथील बी. एम. अगरवाल किराणा जनरल स्टोअर्सचे गौरव राजेंद्र अगरवाल (वय २८) यांच्यावर गुन्हा दाखल केला.

### जादा दराने वस्तू विकणाऱ्यांवर धडक कारवाई

याबरोबरच जादा दराने गॅस सिलिंडरची विक्री करणाऱ्यांवरही पोलिसांचा वॉच असणार आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीने दैनंदिन ठरवून दिलेल्या जीवनाश्यक वस्तूंच्या किमतीपेक्षा चढ्या दराने विक्री करून सामान्य जनतेकडून पैसे उकळणाऱ्या दुकानदार, व्यापाऱ्यांविरुद्ध यापुढेही कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे यांनी दिला आहे.

**Lokmat 30.04.20**

**किराणा दुकानांवर गुन्हे शाखेचे छापे :** तंबाखूजन्य पदार्थही जप्त

# नागरिकांची लूट करणाऱ्या दुकानदारांवर होणार कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रशासनाकडून सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. मात्र, तरीही अनेक दुकानदार अवाच्या सव्वा दरात ग्राहकांना वस्तू विकून त्यांची लूट करत असल्याचे दिसून आले आहे. गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात दुकानदारांवर छापे टाकून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट चारकडून शहरात चढ्या दराने किराणा मालाची विक्री करणाऱ्या दुकानांवर छापे टाकून कारवाई करण्यात आली. या छाप्यांमध्ये काही ठिकाणी तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होतानाही आढळली. त्यांच्यावरही कारवाई करण्यात आली आहे.

खडकी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मुलचंद रामाजी भाटी (६०, रा. खडकी) हा त्याच्या ममता सुपर मार्केटमध्ये कृषि उत्पन्न बाजारसमितीने ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त दराने किराणा विकताना आढळून आला. त्याने गोटा खोबरे १४० रु.अर्धा किलो, शेंगदाणे १३५ रु.किलो, तुरडाळ ५५ रु अर्धा किलो, गुळ ३० रु. अर्धा किलो दराने विकताना आढळला. त्याच्यावर खडकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चतु:शृंगी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोहनलाल दीपाजी चौधरी (४०, रा.चिंचवड) हा त्याच्या बालाजी ट्रेडर्स या बालेवाडी येथील किराणा दुकानात गोटा खोबरे १२० रु. अर्धा किलो, शेंगदाणे ७५ रु अर्धा किलो, गुळ ४० रु. अर्धा किलो, तुरडाळ ७० रु.अर्धा किलो, हरभरा डाळ ५० रु अर्धा किलो, अशा चढ्या दराने विकताना आढळला. त्याच्याविरुद्ध चतु:शृंगी पोलीस ठाण्यात जीवनावश्यक वस्तू कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. येरवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत मानाराम नथाराम देवाशी (३२, रा. कल्याणीनगर) हा महेश सुपर मार्केट या दुकानात दोन किलो तुरडाळ २८० रुपये किलो दराने विकताना आढळला. त्याच्याविरुद्ध येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### तंबाखूजन्य पदार्थांची बेकायदा विक्री वाढली

1 चंदननगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलीस नाईक सुरेंद्र साबळे यांना मिळालेल्या माहितीनुसार अनिल सुपर मार्केट येथे सुनिल भुजबळ हा गायछाप व सिगरेट विकताना सापडला.त्याच्याकडून २,९४८ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून चंदननगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलीसच कर्मचारी गणेश साळुंखे व अतुल मेंगे यांना लोहगाव येथे हातभट्टी दारु विक्री करत असल्याची खबर मिळाली. त्यानुसार गणेश कोळी (२७, रा.लोहगाव) याला पाच लिटर हातभट्टीसह ताब्यात घेण्यात आले.

2 ही कारवाई अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंह , सहायक पोलीस आयुक्त विजय चौधरी, पोलीस निरीक्षक अंजुम बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक गणेश पवार, पोलीस उपनिरीक्षक विजय झंजाड, सहायक फौजदार अब्दुलकरीम सय्यद, शंकर पाटील, भालचंद्र बोरकर, पोलीस कर्मचारी गणेश साळुंखे, राजु मचे, सुनिल पवार, सुरेंद्र साबळे, दत्तात्रय फुलसुंदर, गणेश काळे, सागर घोरपडे, राकेश खुणवे, रमेश राठोड, विशाल शिर्के, शितल शिंदे, निलेश शिवतरे, अतुल मेंगे, सुहास कदम यांच्या पथकाने केली.

**Lokmat 08.04.20**

**समाजात तेढ निर्माण करणारा मेसेज गुन्हा :** गैरकृत्य करणाऱ्या सदस्यासोबत ॲडमिनलाही खावी लागेल जेलची हवा

# व्हॉट्सॲप ॲडमिन सावधान; तुमच्यावर आहे पोलिसांचा 'वॉच'

लोकमत न्यूज नेटवर्क




**Prabhat 01.05.20**

# पाण्याच्या जारमधून गावठी दारू नेणाऱ्यांना अटक

**हडपसर, दि. ३० -** पिण्याच्या पाण्याच्या जारमध्ये गावठी दारू घेऊन प्रवास करणाऱ्या दुचाकीस्वारासह त्याच्या साथीदाराला हडपसर पोलिसांनी कवडीपाठ टोलनाका परिसरात अटक केली आहे. आकाश मनोहर दोडमनी (वय ३२) आणि बबलुकुमार रोहित माझी, अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

हडपसर तसेच लगतच्या परिसरात पाणी टंचाई असल्याने अनेक नागरिक पिण्याच्या पाण्याचे जार विकत घेऊन जातात तर काही जण पालिकेच्या नळांवरील पाणी भरण्यासाठी पायपीट करीत असतात. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचे जार गाडीवर घेऊन जाणारे नागरिक या परिसरात सर्रास दिसतात. याचाच गैरफायदा घेत पाण्याच्या जारमधून गावठी दारूची वाहतूक खुलेआम केली जात होती. याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी जार घेऊन जाणाऱ्यांची तपास सुरू केली होती. अशाच कारवाईत कवडीपाठ येथील टोलनाका परिसरात जारमधून गावठी दारू घेऊन जाणारे सापडले. त्यांच्याकडून दारू जप्त करण्यात आली असून त्यांना अटक करण्यात आली असल्याचे पोलिसांनी सांगितले.

**Lokasatta 03.05.20**

# दारुविक्री प्रकरण; साडेबारा लाखांचा ऐवज जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**हडपसर :** हडपसर भागात गुन्हे शाखेच्या पथकाने विदेशी दारूचे २५ बॉक्स आणि मोटार असा साडेबारा लाखांचा ऐवज जप्त केला आहे. महेश नलवडे आणि त्याच्या साथीदारावर हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरात संचारबंदी आहे. मात्र तरीही गुटखा, दारु आणि इतर वस्तूंची छुप्या पद्धतीने चलती आहे. हडपसरमध्ये मांजरी रस्त्यावर असलेल्या आपुलकी बीअर बारमधून मोटारीतून दारूची वाहतूक केली जात असल्याची माहिती पोलिसांना



पोलिसांनी दोघांना दारूचे बॉक्स व गाडीसह ताब्यात घेतले.

मिळाली होती. माहितीनुसार पोलिसांनी छापा मारला. महेशसह साथीदाराला ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. दोघांनी पोलिसांना धक्काबुक्की करीत पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी दोघांनाही पकडले. त्याच्या मोटारीची झडती घेतली असता, त्यात दारूचे २५ बॉक्स मिळाले. पोलिसांनी दारूचे बॉक्स आणि मोटार असा १२ लाख ५८ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. कारवाई अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, पोलीस उपायुक्त गुन्हे पुणे शहर बच्चनसिंह, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे शाखा शिवाजी पवार, विजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्ता चव्हाण, सहायक पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर, पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ शेंडगे, पोलीस स्टाफ प्रदीप सुर्वे, संतोष मोहिते, दत्ता काटम, प्रवीण शिंदे, भरत रणसिंग, अमजद पठाण, सचिन घोलप, महेश वाघमारे, प्रवीण काळभोर, अश्रुबा मोराळे, प्रमोद घाडगे, दया शेगर, अंकुश जोगदंडे, प्रमोद गायकवाड, संजय दळवी यांनी केली. हडपसर पोलीस आणि गुन्हे शाखेच्या युनिट पाचच्या पथकाने संयुक्तरीत्या कारवाई केली.

**Lokasatta 15.05.20**

### तीन युवक गजाआड, हुक्का पात्रासह मुद्देमाल जप्त

# ऑनलाइन पद्धतीने उच्चभ्रू ग्राहकांना घरपोच हुक्का

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्य सरकारने हुक्का पार्लरवर कायमस्वरूपी बंदी घातलेली असताना उच्चभ्रू ग्राहकांना ऑनलाइन पद्धतीने हुक्का, तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्याचा प्रकार गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने उघडकीस आणला. या कारवाईत सहा हुक्का पात्र, सुगंधी तंबाखू, मोबाइल संच, दोन दुचाकी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी मित विजय ओसवाल (वय १९, रा. वानवडी बाजार), रॉयल जयराम मधुरम (वय २८, रा. लुल्लानगर, कोंढवा), परमेश महेश



ठक्कर (वय २४, रा. भवानी पेठ) यांना अटक करण्यात आली. टाळेबंदीत तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी घालण्यात आलेली आहे. टाळेबंदीत हुक्का ओढणाऱ्या शौकिनांना घरपोच हुक्का पात्र, तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्याबाबतची जाहिरात ओसवाल, मधुरम, ठक्कर यांनी एका संकेतस्थळावर दिली होती. घरपोच हुक्का तसेच साहित्य पोचवण्यात येईल, अशी जाहिरात करण्यात आली होती. याबाबतची माहिती गुन्हे शाखेतील पोलीस उपायुक्त बच्चन सिंह यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला. तांत्रिक तपासात हुक्का विक्रीची ऑनलाइन जाहिरात करणारे कोंढवा भागातील लुल्लानगर परिसरात वास्तव्यास असल्याची माहिती निष्पन्न झाली.

पोलिसांनी बनावट ग्राहकाच्या माध्यमातून हुक्का खरेदीबाबत विचारणा केली. त्यानंतर तिघे जण लुल्लानगर परिसरात हुक्कापात्र, सुगंधी तंबाखू घेऊन आले. पोलिसांनी तेथे सापळा लावून तिघांना ताब्यात घेतले. चौकशीत तिघांनी ऑनलाईन पद्धतीने घरपोच हुक्का विक्री करत असल्याची कबुली दिली.

तिघे जण बेकार असून महाविद्यालयीन युवकांना अमली पदार्थांची विक्री करत असल्याची माहिती निष्पन्न झाली आहे. पोलीस उपायुक्त बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते, उपनिरीक्षक नीलेशकुमार महाडिक, संजय गायकवाड, संदीप साबळे, अमोल पिलाणे, मगर, गुरव, चौधर आदींनी ही कारवाई केली.

**Samana 29.05.20**



# कोंढव्यात विदेशी सिगारेटचा ५४ लाखांचा साठा जप्त

पुणे, दि. २८ (प्रतिनिधी) - लॉकडाऊनमध्ये राहत्या घरामध्ये विदेशी सिगारेटचा साठा करून विक्री करणाऱ्याला गुन्हे शाखेने जेरबंद केले. त्याच्याकडून ५३ लाख ५९ हजारांचा सिगारेट साठा जप्त करण्यात आला.

हरीश पोकाराम चौधरी (वय २६, रा. कोंढवा) असे जेरबंद केलेल्याचे नाव आहे. लॉकडाऊन सुरू असताना राहत्या घरी त्याने विदेशी सिगारेटचा साठा केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी कोंढव्यातील महावीर रेसिडेन्सीमध्ये छापा टाकला असता, तेथे ५३ लाख ५९ हजारांचा विदेशी सिगारेटचा साठा आढळला. ही कामगिरी पोलीस उपायुक्त बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विजय टिकोळे, पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप, सहायक पोलीस निरीक्षक जयवंत जाधव, प्रवीण शिर्के, अर्जुन दिवेकर, सुशील काकडे, शिवाजी राहिगुडे, हेमा ढेबे यांच्या पथकाने केली.

Lokmat 31.05.20

# पॅरोलवरील गुंडाची रॅली काढणाऱ्या ८ जणांना अटक

## पोलीस कर्मचाऱ्याचा समावेश । गावठी पिस्तूल, काडतुसे, आलिशान गाड्या जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे /येरवडा :** खुनाच्या गुन्ह्यातील आरोपींची पॅरोलवर येरवडा कारागृहातून सुटका झाल्यावर त्याची रॅली काढून हुल्लडबाजी करत जाणाऱ्या ८ जणांना विश्रांतवाडी पोलिसांनी शुक्रवारी रात्री अटक केली. त्यांच्याकडून एक गावठी पिस्तूल, पाच काडतुसांसह ४ आलिशान कार जप्त केल्या आहेत.

गंभीर बाब म्हणजे, त्यात पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखेच्या पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश असल्याने पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे.

पोलीस कर्मचारी शरीफ बबन मुलाणी (वय ३६, रा. इंद्रायणीनगर, भोसरी) त्याच्यासह आझाद शेखलाल मुलाणी (वय ३०, रा. तळवडे चिखली), आदेश दिलीप ओकाडे (वय २१ रा. सुयोग नगर, निगडी), मुबारक बबन मुलाणी (वय ३८ रा. मोरेवस्ती, चिखली) संदीप किसन गरुड (वय ४०, रा. तळेगाव दाभाडे), हुसेन जाफर मुलाणी (वय ४३), सिराज राजू मुलाणी (वय २२), बिनोद नारायण माने (वय २६, तिघेही रा. कोळवण, मुळशी) यांच्याविरुद्ध विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

याबाबतची माहिती अशी, शुक्रवारी रात्री पौड येथील खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी समीर मुलाणी व जमीर मुलाणी यांची येरवडा कारागृहातून पॅरोलवर सुटका करण्यात आली. ते सुटणार हे माहिती असल्याने त्याचे भाऊ, नातेवाईक, मित्र, पिंपरी-चिंचवड, मुळशी, भोसरी, चिखली परिसरातून येरवडा कारागृहाच्या परिसरात आले होते. विशेष म्हणजे, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखेचा शरीफ मुलाणी हाही त्यांच्यासोबत आला होता. येरवडा कारागृहातून बाहेर पडल्यावर आरोपी हे त्याचे २० ते २५ नातेवाईक व समर्थक यांच्यासह दुचाकी व चारचाकी गाड्यांमधून हुल्लडबाजी करीत विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोरुन निघाले होते. त्यांचा पाठलाग करत विश्रांतवाडी पोलिसांनी फुलेनगर येथील आरटीओ चौकात एक गाडी अडवून इतरांनादेखील थांबण्यास सांगितले. त्यातील एका गाडीतून एक गावठी पिस्तूल, काडतुसे व लोखंडी बार अशी घातक शस्त्र जप्त करण्यात आली.




### गोंधळात सुटलेले गेले पळून

◆ या गोंधळात कारागृहातून सुटलेले समीर व जमीर मुलाणी हे पळून गेले. पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड, गुन्हे निरीक्षक रवींद्र कदम यांच्यासोबत विश्रांतवाडी पोलीस स्टेशनकडील अधिकारी व कर्मचारी यांनी ही कामगिरी केली. घटनास्थळी पोलीस उपायुक्त पंकज देशमुख, सहायक पोलीस आयुक्त लक्ष्मण बोराटे यांनी भेट घेऊन तपासाच्या सूचना दिल्या.




Prabhat 19.05.20

## आणखी साडेचार लाखांचा तंबाखूचा साठा जप्त

पुणे, दि. १८ - लॉकडाऊनचा गैरफायदा घेऊन सिगारेट आणि तंबाखूजन्य पदार्थांची चढ्या दराने विक्री करणाऱ्या किराणा विक्रेत्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. त्याच्याकडून ४ लाख ३३ हजारांचा तंबाखूजन्य साठा जप्त केला. ही कारवाई लोहगाव वडगावमधील गोपी जवळ स्टोअर्समध्ये करण्यात आली.

नितीन घनश्यामदास अगरवाल (वय ४३, रा. आझाद चौक, लोहगाव) असे गुन्हा दाखल केलेल्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या संबंधित व्यापारी तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करीत असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून खातरजमा केली असता, नितीन किराणा दुकानामध्ये सिगारेट आणि तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करत असल्याचे दिसून आले. त्याच्याकडून हा साठा जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस निरीक्षक विजय टिकोळे, सहायक पोलीस निरीक्षक अर्जुन दिवेकर, शिवाजी राहिगुडे, [illegible] पवार, हेमा ढेबे, अमित छडीदार, सचिन चंदन, योगेश मोहिते यांच्या पथकाने केली.

Prabhat 01.05.20

## पाण्याच्या जारमधून गावठी दारू नेणाऱ्यांना अटक

**हडपसर, दि. ३० -** पिण्याच्या पाण्याच्या जारमध्ये गावठी दारू घेऊन प्रवास करणाऱ्या दुचाकीस्वारासह त्याच्या साथीदाराला हडपसर पोलिसांनी कवडीपाठ टोलनाका परिसरात अटक केली आहे. आकाश मनोहर दोडमनी (वय ३२) आणि बबलुकुमार रोहित माझी, अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

हडपसर तसेच लगतच्या परिसरात पाणी टंचाई असल्याने अनेक नागरिक पिण्याच्या पाण्याचे जार विकत घेऊन जातात तर काही जण पालिकेच्या नळांवरील पाणी भरण्यासाठी पायपीट करीत असतात. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचे जार गाडीवर घेऊन जाणारे नागरिक या परिसरात सर्रास दिसतात. याचाच गैरफायदा घेत पाण्याच्या जारमधून गावठी दारूची वाहतूक खुलेआम केली जात होती. याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी जार घेऊन जाणाऱ्यांची तपास सुरू केली होती. अशाच कारवाईत कवडीपाठ येथील टोलनाका परिसरात जारमधून गावठी दारू घेऊन जाणारे सापडले. त्यांच्याकडून दारू जप्त करण्यात आली असून त्यांना अटक करण्यात आली असल्याचे पोलिसांनी सांगितले.

Lokmat 29.05.20

## ५३ लाखांचा तंबाखूजन्य साठा जप्त

पुणे : गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी पथकाने कोंढवा बुद्रुक येथील महावीर रेसिडेन्सी येथील एका फ्लॅटवर छापा टाकून तब्बल ५३ लाख ५९ हजार रुपयांचा तंबाखूजन्य पदार्थाचा साठा जप्त केला आहे. याप्रकरणी हरीश पोकाराम चौधरी (वय २६, रा. महावीर रेसिडेन्सी, कोंढवा) याच्याविरुद्ध कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. लॉकडाऊनच्या काळात तंबाखूजन्य पदार्थांचा साठा करुन चढ्या दराने विक्री करीत आल्याचे आढळून आले आहे. गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे यांना कोंढव्यातील एका घरातून तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस उपायुक्त बच्चनसिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विजय टिकोळे यांच्या पथकाने महावीर रेसिडेन्सी येथील फ्लॅटवर छापा घातला. यावेळी चौधरी हा देशी-विदेशी कंपन्यांच्या सिगारेट, तसेच प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांचा साठा करुन त्याची चढ्या दराने विक्री करीत असल्याचे आढळून आले. याचबरोबर अन्न व औषध प्रशासनाच्या मदतीने केलेल्या एका कारवाईत १ लाख ८६ हजार रुपयांचा गुटखा व तंबाखूजन्य पान मसालाही जप्त केला आहे.

**Prabhat 25.05.20**

# गांजाची तस्करी; तिघांना अटक

**१२० किलो गांजा, दोन चारचाकी वाहने जप्त**



पुणे, दि. २४ - गांजाची तस्करी केल्याप्रकरणी गुन्हे शाखेच्या खंडणी व अंमली पदार्थविरोधी पथकाने तिघांना अटक केली. यावेळी त्यांच्या ताब्यातून १२० किलो गांजा, दोन चारचाकी वाहने असा ३४ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. विशाखापट्टनम् येथून मुंबईत विक्रीसाठी गांजाची वाहतूक केली जात होती. लॉकडाऊनच्या काळात प्रथमच अंमलीपदार्थांची एवढी मोठी कारवाई केली आहे.

मोहंमद अली शेख (४१, रा. मुंबई), अश्विन शिवाजी दानवे (२६, रा. अंधेरी) अशी ताब्यात घेतलेल्यांची नावे आहेत. उपनिरीक्षक निलेशकुमार महाडिक यांना विशाखापट्टणम् येथून मुंबईला गांजाची वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस पथकाने पहाटे साडेपाचच्या सुमारास पुणे-सोलापूर महामार्गावर सापळा रचला. त्यांना एक संशयित गाडी दिसून आली. गाडी बाजूला घेऊन तपासणी केली असता गाडीत गांजा मिळून आला. त्यांच्याकडे अधिक चौकशी केली तेव्हा त्यांनी शहाळे वाहतूक करणाऱ्या एका चारचाकी वाहनातून इतर गांजा पुढे नेल्याचे सांगितले.

त्यानुसार पोलिसांनी पाठलाग करून खोपोलीजवळ त्या वाहनाला पकडले. त्याची तपासणी करतेवेळी शहाळ्यांच्या खाली लपवून ठेवलेला गांजा मिळून आला. या दोन्ही वाहनांतून पोलिसांनी १२० किलो गांजा जप्त केला. यावेळी तिघांना ताब्यात घेतले असून, गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

या कारवाईत अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, उपायुक्त बच्चन सिंह, सहायक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र मोहिते, उपनिरीक्षक निलेशकुमार महाडिक, पोलीस कर्मचारी मगर, गरुड, शिंदे, काळभोर, वाजळे बागवान, पवार, येलपले यांनी केली.

**Pudhari 06.05.20**

# गुटख्याची अवैध वाहतूक करून विक्री करणारा ताब्यात

**गुन्हे शाखा युनिट तीनची कामगिरी; सव्वातीन लाखांचा मुद्देमाल जप्त**

पुणे: पुढारी वृत्तसेवा

[illegible]

**तलवारीने वार करून सोनसाखळी लांबवली**

[illegible]

**Prabhat 19.05.20**

# हातभट्टी दारूचा 'महापूर'; महंमदवाडीत मोठी कारवाई

प्रभात वृत्तसेवा



पुणे, दि. १८ - करोनामुळे शहरात संचारबंदी असतानाही महंमदवाडीतील कंजारभाट वस्तीवर हातभट्टी दारू तयार करण्यात येत होती. तेथे गुन्हे शाखेने छापा टाकून गावठी हातभट्टी दारू तयार करण्यासाठी लागणारे १५ हजार लिटर रसायन, १५० लिटर दारू मिळून ४० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी बसंती विजय बिनावत (वय ४०, रा. कंजारभाट वस्ती, महंमदवाडी) हिच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कंजारभाट वस्तीवर गावठी हातभट्टी दारू तयार केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकला असता, त्याठिकाणी हातभट्टी दारू तयार करण्यासाठी लागणारे १५ हजार लिटर रसायन, १५० लिटर दारू जप्त केली. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्ता चव्हाण, सहायक पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर, पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ शेंडगे, प्रदीप सुर्वे, संतोष मोहिते, दत्ता काटम, प्रवीण शिंदे, भरत रणसिंग, अमजद पठाण, स्नेहल जाधव, प्रमोद घाडगे, दया शेगर, संजय दळवी यांच्या पथकाने केली.

**Prabhat 15.05.20**

# हुक्क्याची 'होम डिलिव्हरी' करणारे कोंढव्यात त्रिकुट जेरबंद

पुणे, दि. १४ - करोनाच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या लॉकडाऊन कालावधीत हुक्क्याची ऑनलाइन ऑर्डर घेऊन 'होम डिलिव्हरी' करणाऱ्या तिघांना गुन्हे शाखेने जेरबंद केले. त्यांच्याकडून ६ हुक्का भांडी, सहा तंबाखूजन्य फ्लेवर पाकीट, चार मोबाइल फोन, दोन दुचाकी असा १ लाखाचा ऐवज जप्त केला. ही कारवाई कोंढव्यातील लुल्लानगर परिसरातील धर्मादास लुल्लागार्डन येथे केली. मित विजय ओसवाल (वय १९, रा. वानवडी बाजार), रॉयल जयराम मधुरम (वय २८, रा. लुल्लानगर, कोंढवा), परमेश महेश ठक्कर (वय २४, रा. भवानी पेठ) अशी जेरबंद केलेल्यांची नावे आहेत. ही कामगिरी पोलीस उपायुक्त बच्चन सिंह, पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते, पोलीस उपनिरीक्षक नीलेशकुमार महाडिक, संजय गायकवाड, संदीप साबळे यांच्या पथकाने केली.

**Pudhari 29.05.20**

# दरोड्याच्या तयारीतील सशस्त्र टोळी जेरबंद

पुणे : पुढारी वृत्तसेवा

[illegible]

**Pudhari 03.05.20**

# हडपसरमध्ये साडेबारा लाखांची दारू जप्त

पुणे, हडपसर : पुढारी वृत्तसेवा

[illegible]

**Prabhat 31.05.20**

# पॅरोल कैद्यांच्या स्वागतासाठी जमलेल्या टोळक्याला अटक

## येरवडा कारागृहाबाहेर घातला गोंधळ

येरवडा, दि. ३० (प्रतिनिधी) - येरवडा कारागृहात शिक्षा भोगणाऱ्या खुनाच्या गुन्ह्यातील दोन कैद्यांना पॅरोल मंजूर झाल्यानंतर त्यांच्या स्वागतासाठी कारागृहाबाहेर ३० ते ४० तरुणांनी गर्दी केली. या सर्वांनी लॉकडाऊनच्या नियमांचा भंग करीत वाहनांचा कर्णकर्कश आवाज आणि आरडाओरडा केला. विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड, पोलीस हवालदार दिनकर लोखंडे,पोलीस शिपाई सोमनाथ खळसोडे, वामन सावंत, अनिकेत भिंगारे यांनी या हुल्लडबाजी करणाऱ्यांनाचा पाठलाग करून फुलेनगर जवळ अडवून एका पोलीस कर्मचाऱ्यासह आठ जणांना अटक केली असून त्यांच्याकडून पिस्तूल, जिवंत काडतुसे, लोखंडी सळ्या जप्त केल्या आहेत. या आरोपींना न्यायालयात हजर केले असता यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी मिळाली आहे.

या प्रकरणी पोलीस शिपाई सोमनाथ खळसोडे यानी फिर्याद दिली असून यात पोलीस कर्मचारी शरीफ बबन मुलाणी (वय ३६,रा भोसरी), आझाद शेखलाल मुलाणी (वय ३०,रा चिखली),



आदेश दिलीप ओकांडे (वय २१,रा.निगडी), मुबारक बबन मुलाणी (वय ३८, रा. चिखली), संदीप किसन गरुड (वय ४०, रा. तळेगाव दाभाडे), हुसेन जाफर मुलाणी (वय ४३ रा मुळशी), सिराज राजू मुलाणी (वय २२, रा मुळशी), विनोद नारायण माने (वय २६ रा.मुळशी) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारागृहाबाहेर पॅरोल मंजूर झालेले कैदी कारागृहाबाहेर आल्यानंतर त्यांच्या स्वागतासाठी ३० ते ४० तरुणांनी वाहनांचा कर्णकर्कश आवाज करीत आरडाओरडा केल्याची माहिती मिळताच, पोलिसांनी त्यांचा पाठलाग करीत त्यांच्या वाहनांना अडवले. यावेळी कारागृहातून पॅरोलवर सुटका झालेले दोन्ही कैदी पसार झाले. तरुणांसोबत पिंपरी-चिंचवड आयुक्तालयात काम करणारा एक पोलीस कर्मचारीही होता. त्याच्यासोबत कारमध्ये अन्य तिघेही होते.

पोलिसांनी कारमधून बेकायदा पिस्तूल, पाच जिवंत काडतुसे, लोखंडी सळ्या तसेच त्यांच्याकडील तीन कारही जप्त केल्या आहेत. पळून गेलेला कैदी हा पोलीस कर्मचाऱ्याचा भाऊ असल्याचे समजते. विश्रांतवाडी पोलिसांनी कारवाई करून पोलीस कर्मचाऱ्यासह आठ जणांना अटक केली आहे. घटनास्थळी पोलीस उपायुक्त पंकज देशमुख सहायक पोलीस उपायुक्त लक्ष्मण बोराटे भेट देऊन तपासाच्या सूचना केल्या. ही कामगिरी सहाय्यक पोलीस निरीक्षक संदिप यादव, सचिन निकम, पोलीस उपनिरीक्षक लहु सतपुते, पोलीस हवालदार दिनकर लोखंडे, रामाने, विजय सावंत, किशोर दुशिंग, प्रविण भालचिम, यशवंत किर्वे, शेखर खराडे, संदिप देवकाते, प्रफुल्ल मोरे, सोमनाथ खळसोडे, वामन मोरे यांनी पार पाडली.

**Sakal 01.05.20**

# शिवण्यात १४ लाखांचा सिगारेट, तंबाखूचा साठा जप्त



**पुणे, ता. ३० :** कारमधून तंबाखू व सिगारेटची विक्री करणाऱ्या व त्यांना मालाचा पुरवठा करणाऱ्यांना गुन्हे शाखेच्या युनिट एकने अटक केली आहे. त्यांच्याकडून १४ लाख ४१ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. शिवणे परिसरात ही कारवाई करण्यात आली.

रोहीत सिताराम प्रजापती (वय २३, रा. महालक्ष्मी कॉम्प्लेक्स, शिवणेगाव), विजय सिताराम प्रजापती (वय २५), पंकज शिवनारायण प्रजापती (वय २२) आणि मुकेश पारसमल छाजेड वय (वय ४०, सर्वजण रा. सहकारनगर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. प्रजापती हा मालाचा पुरवठा करत होता.

पोलिस नाईक सचिन जाधव यांना तंबाखूजन्य पदार्थ विक्रीची माहिती मिळाली होती. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त अशोक मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक अरुण वाईकर यांच्या पथकाने शिवणे येथील महालक्ष्मी कॉम्लेक्सवर छापा टाकला. त्यावेळी तीन सुझुकी कारमध्ये मोठ्या प्रमाणात सिगारेट व तंबाखू विक्रीसाठी ठेवल्याचे आढळून आले. या ठिकाणा तीन आरोपींना अटक करत तब्बल १४ लाख ४१ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**Samana 25.05.20**

# येरवड्यातून चौघे तडीपार

पुणे, दि. २४ (प्रतिनिधी) - येरवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत मारामारी, खुनाचा प्रयत्न, नागरिकांमध्ये दहशत माजविल्याप्रकरणी चौघांना दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले आहे.

सचिन गोविंद अडागळे (वय २५, रा. येरवडा), समीर शब्बीर शेख (वय २४), शकील शब्बीर शेख (वय २०, दोघेही रा. सुरक्षानगर, येरवडा), मोहसीन अन्वरखान (वय २९, रा. नवी खडकी, येरवडा) अशी तडीपार करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

**Pudhari 07.05.20**

# हातभट्टी अड्ड्यावर छापा; ६ जणांवर गुन्हा

**पुणे : पुढारी ऑनलाईन**

येरवडा परिसरातील पांडूलमान वस्ती व नाईकनगर येथे पोलिसांनी अवैध हातभट्टीच्या दारू धंद्यावर कारवाई केली. या वेळी १६०० लिटर रसायन, १५० लिटर हातभट्टी दारू व दारू गाळण्याचे सामान असा एकूण ७२ हजार रुपये किमतीचा माल जप्त करून नष्ट केला. याप्रकरणी येरवडा पोलिस ठाण्यात सहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच, पोलिस ठाणे हद्दीतील कोरोना विषाणूच्या अनुषंगाने प्रतिबंधित केलेल्या क्षेत्रांमधील काही दुकानदार हे पहाटेच्या वेळी दुकाने चालू ठेवून मालाची विक्री करतात, अशी माहिती पोलिसांना मिळाली होती, त्यानुसार पोलिस निरीक्षक गुन्हे अजय वाघमारे, सहायक पोलिस निरीक्षक बलभीम ननावरे, सहायक पोलिस निरीक्षक समीर करपे व कर्मचाऱ्यांनी पहाटे ५ ते सकाळी ७ वाजताचे दरम्यान येरवडा भागांमध्ये गस्त केली असता ४ दुकाने उघडी मिळून आली. त्यानुसार त्या दुकानदारावर कलम १८८, २६९, २७१ व इतर कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

Lokmat 11.06.20

# ४३ कोटींच्या बनावट नोटा जप्त

## ४.२ कोटींचे बनावट डॉलर जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** लष्कराची गुप्तचर यंत्रणा आणि गुन्हे शाखेच्या पोलिसांनी विमाननगर परिसरातील संजय पार्क सोसायटीतील एका घरातून छापा मारून तब्बल ४३ कोटी ४० लाख रुपयांच्या व ४ कोटी २० लाख किमतीच्या अमेरिकन डॉलरच्या बनावट नोटा जप्त केल्या आहेत. यात सहा जणांना अटक करण्यात आली आहे. यापैकी एक आरोपी लष्कराशी संबंधित आहे. उर्वरित पाच जण हवाला



रॅकेटमधील आहेत.

शेख अलिम समाद गुलाब खान (वय ३६, रा. प्रतीकनगर, येरवडा), सुनील सारडा (वय ४०), अब्दुल गणी रहेमतुल्ला खान (वय ४३), अब्दुर रहेमान अब्दुलगणी खान (वय १८), रितेश रत्नाकर (वय ३४), तुफेल अहमद महमद इशोक खान (वय २८) अशी ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे आहेत, तर यातील शेख अलिम खान हा बॉम्बे सॅपर्स डेपो बटालियन, खडकी येथील कर्मचारी आहे. याबाबत उपनिरीक्षक नीलेशकुमार महाडिक यांनी फिर्याद दिली आहे. पोलीस उप आयुक्त (गुन्हे शाखा) बच्चन (पान ५ वर)

# ४३ कोटींच्या बनावट नोटा जप्त

(पान १ वरुन) सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार : लष्कराची गुप्तहेर यंत्रणा आणि गुन्हे शाखा यांना विमाननगर या भागातील एका घरात बनावट नोटांचा व्यापार होत असल्याची माहिती मिळाली होती. एक खोली भरुन नोटांची थप्पी असल्यामुळे, रात्री उशिरापर्यंत पोलीस नोटा मोजण्याचे काम करत होते. याप्रकरणी खडकी येथील बॉम्बे सॅपर्समधील एका कर्मचाऱ्यासह सहा जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. नवीन दोन हजार आणि पाचशे रुपयांच्या बनावट नोटा भरलेले बॉक्स खोली भरुन आढळून आले; मात्र या नोटा खेळण्यात वापरण्यासाठी छापल्या असल्याचे त्यावर नमूद केले होते.

अटक करण्यात आलेल्या आरोपीत मुंबई व पुण्यातील लोकांचा समावेश आहे. सैन्यदलाच्या गुप्तचर विभागामार्फत पोलिसांना याची माहिती मिळाल्यानंतर, सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी उपायुक्त बच्चन सिंह यांना कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट चार निरीक्षक अंजुम बागवान, उपनिरीक्षक नीलेशकुमार महाडिक यांच्या पथकाने सापळा रचून कारवाई केली.

Loksatta 16.06.20

# मंदिरात चोरी; अल्पवयीन ताब्यात

**पुणे :** ऐतिहासिक श्री पासोड्या विठोबा मंदिरातील दानपेटीतील रोकड चोरून पसार झालेल्या अल्पवयीन मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतले. याबाबत मंदिरातील सेवेकरी कमल पवार (वय ७४,रा.तपकीर गल्ली,बुधवार पेठ) यांनी फरासखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

याप्रकरणी १५ वर्षीय अल्पवयीन मुलाला ताब्यात घेण्यात आले असून तो फिरस्ता आहे. सोमवार पेठेतील दारूवाला पूल परिसरातील पदपथावर तो राहायला आहे. रविवारी (१४ जून) सकाळी बुधवार पेठेतील श्री पासोड्या विठोबा मंदिरातील दानपेटी उचकटून रोकड चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला होता. पोलिसांकडे तक्रार करण्यात आल्यानंतर या भागातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण पडताळण्यात आले. चित्रीकरणात अल्पवयीन मुलाने मंदिरात शिरून चोरी केल्याचे आढळून आले. त्याने दानपेटीतील १४०० रुपयांची रोकड चोरल्याची कबुली दिली.

Lokmat 06.06.20

# तीन दुचाक्या चोरणारा वाहनचोर अटकेत

**पुणे :** लॉकडाऊनच्या काळातदेखील गुन्ह्यांचे प्रमाण वाढीस लागले असताना त्यावर प्रतिबंध घालण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून कारवाई करण्यात आली आहे. यात संचित रजेवर (पॅरोलवर) असणाऱ्या गुन्हेगारांविरोधात कडक धोरण अमलात आणले जात आहे. नऱ्हेगाव येथील एकाला तीन दुचाक्या चोरल्याप्रकरणी युनिट तीनकडून अटक करण्यात आली आहे.

रवींद्र ज्ञानदेव राऊत (रा. नऱ्हेगाव) असे आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून तीन दुचाक्या हस्तगत करण्यात आल्या आहेत. गुन्हे शाखा युनिट ३चे पोलीस अधिकारी व कर्मचारी गस्त घालत असताना त्यांना एका व्यक्तीकडे चोरीचे वाहने असल्याची माहिती पोलीस शिपाई नितीन रावळ व कैलास साळुंके यांच्याकडून मिळाली. त्यानुसार सापळा रचून रवींद्रला गाड्यांसह ताब्यात घेण्यात आले. तसेच पुढील कार्यवाहीसाठी सिंहगड पोलिसांकडे वर्ग करण्यात आले आहे. युनिट तीनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मोकाशी, सहायक निरीक्षक भालचंद्र ढवळे, उपनिरीक्षक किरण अडागळे व कर्मचारी विल्सन डिसोझा यांनी कारवाई केली.

Lokmat 12.06.20

# दरोड्याच्या तयारीतील चोरटे जेरबंद

**पुणे :** दरोड्याच्या तयारीतील चोरट्यांना हडपसर भागात पोलिसांनी पकडले. चोरट्यांकडून तीक्ष्ण शस्त्र, दुचाकी, कटावणी, मिरची पूड असा मुद्देमाल जप्त केला. अंधारात पसार झालेल्या चोरट्यांच्या साथीदारांचा शोध सुरु आहे.

तिलकसिंग गब्बरसिंग टाक (वय २८, रा. रामटेकडी, हडपसर), अजिनाथ लक्ष्मण गायकवाड (वय २४, रा. कृष्णानगर, कोंढवा) अशी अटक केलेल्या चोरट्यांची नावे आहेत. याप्रकरणी आणखी तीन जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरीक्षक हिमालय जोशी यांनी यासंदर्भात हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. टाक, गायकवाड आणि त्यांच्याबरोबर असलेले तीन साथीदार हडपसर भागातील कालवा रस्त्यावर अंधारात थांबले होते.

**Lokmat 16.06.20**

# दरोड्याच्या तयारीत आलेल्या ७ जणांना अटक

## आधी टेम्पोला लुटले : सिंहगड रस्ता पोलिसांची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : नऱ्हे येथे दरोड्याच्या तयारीने एकत्र आलेल्या ७ जणांच्या टोळक्याला सिंहगड रोड पोलिसांनी अटक केली आहे.

रोहित प्रकाश पोकळे (वय २८, रा. गणेश पेठ), अमित धनंजय बोराटे (वय २५, रा. गुरुवार पेठ), भूषण रमेश मोहिते (वय ३७, रा. बेनकरवस्ती, धायरी), संदीप संजय दुबे (वय २५, रा. शुक्रवार पेठ), शुभम राजेश पवार (वय २५, रा. गणेश पेठ), सागर बाळासाहेब टिळेकर (वय २३, रा. गंज पेठ), अभिषेक संतोष पन्हाळे (वय २१, रा. गंज पेठ) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. ही कारवाई धायरी रोडवरील नऱ्हे येथील ऑपलोन्स सोसायटीसमोर सोमवारी पहाटे दीड वाजता करण्यात आली.

याप्रकरणी पोलीस नाईक सचिन तनपुरे यांनी सिंहगड रोड पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे सर्व जण धायरी रोडवर मध्यरात्रीच्या सुमारास दरोडा टाकण्याच्या तयारीत एकत्र आले होते. त्यांनी तेथून जाणाऱ्या एका टेम्पोचालकाला मारहाण करून लुटले होते. याची माहिती मिळाल्यावर सिंहगड रोड पोलिसांनी रात्री सापळा रचला. दोन दुचाकीवरील चौघे जण आणि मोटारीत बसलेले काही जण पोलिसांना दिसून आले. त्यामुळे पोलिसांनी त्यांच्याकडे जाऊन चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यांच्याकडील मोटारीची झडती घेतली असता त्यामध्ये मिरची पूड, घातक शस्त्रे, दोरी आढळून आली. त्यानुसार पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी एका टेम्पोचालकाला अडवून मारहाण केल्याची कबुली दिली. नऱ्हे परिसरात दरोडा घालणार असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. या सर्वांना न्यायालयात हजर केले असताना न्यायालयाने अधिक तपासासाठी २ दिवस पोलीस कोठडी मंजूर केली आहे. पोलीस उपनिरीक्षक नितीन जाधव अधिक तपास करीत आहेत.




## तलवारीच्या धाकाने दुचाकी चोरणाऱ्या दोघा सराईतांना अटक

पुणे : तलवारीचा धाक दाखवत तरुणाला मारहाण करून त्याची दुचाकी चोरून नेणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना विमानतळ पोलिसांनी अटक केली. त्याचे दोन साथीदार पळून गेले. दिनेश कांबळे आणि करण राखपत्रे अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. ही घटना लोहगावमधील वडगाव शिंदे रोडवरील जनार्धननगर येथील सीएनजी पंपाजवळ १४ जून रोजी दुपारी एक वाजता घडली होती. याप्रकरणी सनी गेचंद (वय 30, रा. राजीव गांधीनगर, येरवडा ) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सनी गेचंद हे अजय आणि प्रशांत जाधव या मित्रासोबत जनार्धननगर येथील किराणा दुकानासमोर पाणी पित थांबले होते. त्या वेळी तेथे दिनेश कांबळे, करण आणि त्यांचे दोन साथीदार आले. त्यांनी सनीला दमदाटी केली. तुझ्या खिशात किती पैसे आहेत काढ लवकर, नाहीतर तुझी विकेटच काढतो, अशी धमकी देऊन मारहाण केली. त्यानंतर या टोळक्याने सनीकडून त्यांच्या दुचाकीची चावी घेऊन ती चोरून नेली.

**Lokmat 24.06.20**

## बाणेरमध्ये वेश्याव्यवसाय; महिलांची सुटका

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : महिलांना जादा पैशांचे आमिष दाखवून वेश्या व्यवसायास प्रवृत्त करणाऱ्या मॅनेजरला चतु:शृंगी पोलिसांनी अटक केली आहे. चार महिलांची सुटका करण्यात आली.

सुरेश प्रल्हाद रणवीर (वय २५, रा. बाणेर) असे अटक केलेल्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाणेरमधील धनकुडे वस्तीलगत पाषाण टेकडीजवळ एका रो हाऊसमध्ये वेश्याव्यवसाय करवून घेतला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार चतु:शृंगी पोलिसांनी तेथे छापा टाकून चार महिलांची सुटका केली.

सामाजिक सुरक्षा विभागाने बंदी असतानाही मसाज सेंटर सुरु ठेवणाऱ्या तीन ठिकाणी कारवाई करुन त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

धनकवडी येथील चैतन्यनगरमधील आयुर्वेदिक मसाज सेंटर सुरु असल्याची माहिती मिळाली. तेथून ५ महिला व एका पुरुषाला ताब्यात घेण्यात आले. हडपसर येथील भोसले गार्डनमधील न्यू लोटस आयुर्वेदिक पंचकर्म हे मसाज सेंटर सुरु होते. तेथे छापा घालून २ महिला व एका पुरुषाला ताब्यात घेण्यात आले. मंत्रा स्पा व मसाज सेंटर हे चालू असल्याची माहिती मिळाल्यावरुन तेथे छापा घालून ३ महिलांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याविरुद्ध कोविड उपाययोजना २०२० नुसार कारवाई करण्यात आली आहे.

**Lokmat 12.06.20**

# बनावट नोटाप्रकरणी सहा जणांना कोठडी

## ८७ कोटींच्या बनावट नोटा जप्त : विमानतळ पोलिसांची कारवाई; हेतूबाबत होणार चौकशी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** आपसांत संगनमत करून तब्बल ८७ कोटी ५ लाख ७५ हजारांच्या बनावट नोटा देऊन फसवणूक केल्याप्रकरणी विमानतळ पोलिसांनी सहा जणांना अटक केली आहे. पुढील तपासासाठी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना १५ जूनपर्यंत कोठडीचा आदेश दिला आहे. याप्रकरणी खंडणी व अमली पदार्थविरोधी पथकाचे पोलीस उपनिरीक्षक नीलेशकुमार महाडिक यांनी फिर्याद दिली होती.

रितेश रत्नाकर (वय ३४, रा. कामोठे, नवी मुंबई), अब्दुलगणी रेहमततुल्ला खान (वय ४३, रा. खुशिंदा टॉवर, नयानगर, ठाणे), तुफेल अहमद महंमद इसाक खान (वय २८, रा. अस्मिता पर्ल, ठाणे), शेख अलीम समद गुलाब खान (वय ३६, रा. जेसीडी पार्क, प्रतीकनगर, येरवडा), सुनील बद्रीनारायण सारडा (वय ४०, कोंढवा बद्रक), अब्दुल रेहमान अब्दुलगणी खान (वय १९, रा. ठाणे) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. ही घटना १० जून रोजी दुपारी एकच्या सुमारास लोहगाव येथील संजय पार्क या ठिकाणी घडली. या कारवाईत पाच मोबाइल फोन, २ लाख ८९ हजारांची रोख रक्कम, १२०० अमेरिकन डॉलर, भारतीय चलनातून बंद झालेल्या हजार, दोन हजार, पाचशे रुपयांच्या बनावट नोटा, मेटल डिटेक्टर, जप्त केले आहेत. आरोपींनी या बनावट नोटा खऱ्या असल्याच्या भासवण्याच्या उद्देशाने फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमद केले आहे.

◆ अटक आरोपी यांनी ८७ कोटी ५ लाख ७५ हजार रुपयांची बनावट रक्कम जवळ कशासाठी ठेवली, ती रक्कम त्यांना कोठून मिळाली, तसेच ती कुठे छापली याचा तपास करणे, याबरोबरच आरोपींचे मोठे रॅकेट आहे काय याचा तपास करणे, आरोपींनी ज्या बंगल्यातून बनावट नोटा ठेवल्या होत्या त्या बंगल्याच्या मालकाची माहिती घेणे, आरोपींनी आणखी किती जणांना फसवले आहे तसेच शेख अलीम समद गुलाब आरोपी संरक्षण दलातील लान्स लाईक पदावरील कर्मचारी असून या गुन्ह्यात तो मुख्य सूत्रधार असल्याने सखोल तपास करण्यासाठी कोठडीची मागणी सरकारी वकील नितीन कोंघे यांनी केली. न्यायालयाने ती मान्य केली.

**Loksatta 30.06.20**

# ऑनलाइन वेश्याव्यवसायाचे बिंग फुटले

## बँकेच्या व्यवस्थापकासह चौघे अटकेत; संगणक अभियंताही आरोपी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** ऑनलाइन वेश्याव्यवसाय प्रकरणात चतुःशृंगी पोलिसांनी कारवाई करून एका राष्ट्रीयीकृत बँकेचा व्यवस्थापक, संगणक अभियंत्यासह चौघांना अटक केली. बाणेर भागातील एका बंगल्यावर पोलिसांनी छापा टाकून ही कारवाई केली.

याप्रकरणी राष्ट्रीयीकृत बँकेचा सहायक व्यवस्थापक रविकांत बालेश्वर पासवान (वय ३४, रा. प्राईम सोसायटी, सूस, मूळ रा. बिहार), संगणक अभियंता दीपक जयप्रकाश शर्मा (वय ३६, रा. साई चौक, बालेवाडी, मूळ रा. ओदीशा), सुरेश प्रल्हाद रणवीर (वय २५, रा. बाणेर, मूळ रा. हातगाव, नांदेड), नाकसेन रामदास गजघाटे (वय ५२, रा. शगुन निसर्ग सोसायटी, बावधन) यांना अटक करण्यात आली. याप्रकरणात शिवानी पाटील उर्फ जोया रेहान खान (रा. भोपाळ, मध्यप्रदेश) हिच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून ती पसार झाली आहे. चार दिवसांपूर्वी चतुःशृंगी पोलिसांनी बाणेर भागातील धनकुडे वस्ती परिसरात असलेल्या एका बंगल्यावर छापा टाकून कारवाई केली होती.

पोलिसांनी याप्रकरणाचा तपास सुरू केला, तेव्हा ऑनलाइन पद्धतीने वेश्याव्यवसाय सुरू असल्याचे स्पष्ट झाले होते. त्यासाठी एका संकेतस्थळाचा वापर करण्यात येत होता. गजघाटे याच्या मालकीच्या बंगल्यात वेश्याव्यवसाय करण्यात येत होता. तेथे व्यवस्थापक म्हणून रणवीर काम करत होता. त्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. तपासात एका बँकेत सहायक व्यवस्थापक असलेला पासवान या ऑनलाइन वेश्याव्यवसायाचा मुख्य सूत्रधार असून ऑनलाइन वेश्याव्यवसायासाठीच्या तांत्रिक बाबी संगणक अभियंता शर्मा सांभाळत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलीस उपायुक्त पंकज देशमुख, सहायक आयुक्त लक्ष्मण बोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शेवाळे, उपनिरीक्षक मोहन जाधव, प्रकाश आव्हाड यांच्या पथकाने बालेवाडी, बाणेर, मुंबई भागात कारवाई करून आरोपींना अटक केली.

**Lokmat 08.06.20**

# फरार गुन्हेगाराला पिस्तुलासह अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** जबरी चोरी व शरीराविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये गेल्या ६ महिन्यांपासून फरार असलेल्या सराईत गुन्हेगाराला गुन्हे शाखेच्या युनिट ४च्या पथकाने येरवड्यात पकडले.

अनिकेत जगन्नाथ काकडे (वय २३, रा. शेलारचाळ, येरवडा) असे त्याचे नाव आहे. त्याने व त्याचे मित्र शादाफ जहांगीर बांगी व यश हृषी गायकवाड यांनी राजेश लिलाधर म्हात्रे (वय ४६, रा. बेलापूर, मुंबई) यांना रिक्षात बसवून दारू पाजून मुळा नदीच्या पात्रात २६ नोव्हेंबर २०१९ रोजी आणले व त्यांच्याकडील ४ लाख रुपये काढून घेऊन त्यांना तेथेच सोडून दिले होते. भरपूर दारू पिलेल्या अवस्थेत सोडल्याने रात्री थंडी वाऱ्यात त्यांचा मृत्यू झाला होता. काकडे याच्या दोन साथीदारांना पोलिसांनी पकडले होते. तेव्हापासून काकडे फरार होता. युनिट ४च्या पथकातील पोलीस शिपाई रमेश राठोड व सागर घोरपडे यांना तडीपारी संपलेला अनिकेत काकडे हा येरवड्यातील इराणी मार्केटमध्ये येणार असल्याची माहिती मिळाली. तो एका बर्फाच्या गाडीमध्ये बसून सासवडला जाणार असल्याचे समजले. त्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक गणेश पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी इराणी मार्केटजवळ सापळा लावून त्याला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एक लोखंडी गावठी पिस्तूल व २ काडतुसे मिळाली. अनिकेत काकडे हा तडीपारीत असताना त्याचा भाऊ आदर्श काकडे याचा स्थानिक भांडणामधून खून करण्यात आला होता. त्यामुळे तो येरवडा परिसरात लपून छपून हत्यारानिशी वावरत होता.

अनिकेत काकडे याच्याकडे चौकशी केल्यावर त्याने आकाश ऊर्फ टक्या भगवान मिरे (रा. सेवक चौक, येरवडा) याला एक पिस्तूल दिल्याचे सांगितले. सध्या तो येरवडा पोलिसांच्या कोठडीत आले. त्याच्या घरातून १ पिस्तूल हस्तगत करण्यात आले.

**Loksatta 04.06.20**

# विद्यार्थ्यांना अमली पदार्थांची विक्री; दोघे अटकेत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** विमाननगर भागात वास्तव्यास असलेल्या विद्यार्थ्यांना मेफेड्रोन नावाच्या अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या चौघांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून मेफेड्रोन (एमडी) तसेच दुचाकी, मोबाइल संच, रोकड असा मुद्देमाल जप्त करण्यात आला

वाप्रकरणी अमजद मकबुल खान (वय ४४ रा.एडी कॅम्प चौक, भवानी पेठ), तजेंदर पालसिंग बग्गा (वय २१,रा.विमाननगर) यांना अटक करण्यात आली. विमाननगर भागात परप्रांतीय विद्यार्थी वास्तव्यास आहेत. या भागात वास्तव्यास असलेल्या युवक आणि युवतींना खान आणि बग्गा अमली पदार्थांची विक्री करत असल्याची माहिती अतिरिक्त पोलीस आयुक्त अशोक मोराळे आणि उपायुक्त बच्चन सिंह यांना मिळाली होती. त्यानंतर खंडणी आणि अमली पदार्थ विरोधी पथकाने या भागात सापळा लावला होता. दुचाकीस्वार खान आणि बग्गा विमाननगर भागात येणार असल्याची माहिती मिळाली. दोघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून मेफेड्रोन नावाचा अमली पदार्थ आणि दुचाकी, रोकड, मोबाइल संच असा एक लाख अठरा हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अटक करण्यात आलेल्या आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने दोघांना शुक्रवारपर्यंत (५ जून) पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. सहायक आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते, उपनिरीक्षक संजय गायकवाड, प्रसाद मोकाशी, उदय काळभोर, पांडुरंग वांजळे, हनुमंत गायकवाड, फिरोज बागवान, रुपाली कर्णवर यांनी ही कारवाई केली.

**Loksatta 09.06.20**

# रिव्हॉल्वर बाळगणारा तडीपार गुंड जेरबंद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** देशी बनावटीचे रिव्हॉल्वर बाळगणाऱ्या तडीपार गुंडाला गुन्हे शाखेने पकडले. गुंडाकडून देशी बनावटीचे रिव्हॉल्वर आणि दोन काडतुसे जप्त करण्यात आली.

अक्षय श्रीकांत अवघडे (वय २६, रा. अप्पर इंदिरानगर, व्हीआयटी महाविद्यालयाजवळ) असे अटक करण्यात आलेल्या गुंडाचे नाव आहे. अवघडे सराइत असून त्याला बिबवेवाडी पोलिसांनी तडीपार केले होते. शहरातून तडीपार केल्यानंतर त्याने आणि त्याच्या बरोबर असलेल्या एका साथीदाराने एका युवकावर तीक्ष्ण शस्त्राने वार केले होते. अवघडेकडे देशी बनावटीचे रिव्हॉल्वर असल्याची माहिती पोलीस हवालदार संतोष क्षीरसागर आणि अमोल साठे यांना मिळाली होती. अवघडे वारजे भागात येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तेथे सापळा लावला.

अवघडेला ताब्यात घेण्यात आले. त्याची झडती घेण्यात आली. तेव्हा त्याच्याकडे देशी बनावटीचे रिव्हॉल्वर असल्याचे उघडकीस आले. रिव्हॉल्वरसह दोन काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. सहायक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेतील युनिट तीनच्या पोलिसांनी ही कारवाई केली.

**Prabhat 11.06.20**

# 43 कोटींच्या बनावट नोटा जप्त

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १० - परदेशी आणि भारतीय चलनातील बनावट नोटा घेऊन आलेल्या टोळीला लष्कराची गुप्तचर यंत्रणा आणि पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने संयुक्त कारवाई करीत पकडले. या बनावट नोटांमध्ये दोन हजार, एक हजार आणि पाचशेच्या नोटांचा समावेश आहे. तसेच, काही बनावट अमेरिकन डॉलरही ताब्यात घेण्यात आले. या बनावट चलनाची एकूण किंमत ४३.२ कोटी आणि ४.२ कोटी अमेरिकन डॉलर अशी असल्याचे समजते

शेख आलम गुलाम खान (३६, रा. येरवडा), सुनील बद्रीनारायण सारडा (४०), रितेश रत्नाकर (३४), तुफेल अहमद मोहंमद इशाक खान (३४), अब्दुल गनी रेहमतुल्ला खान, अब्दुल रेहमान अब्दुल गनी खान अशी आरोपींची नावे आहेत. यातील बहुतेक नोटांच्या बंडलांवर चिल्ड्रन बँक ऑफ इंडिया असे लिहिले होते. तज्ज्ञांकडून नोटांची तपासणी करण्यात येत आहे.

विमानतळ परिसरातील संजय पार्क सोसायटीतील एका घरात छापा टाकून ही कारवाई करण्यात आली. एक खोली भरून नोटांची थप्पी



असल्यामुळे रात्री उशिरापर्यंत मोजणी सुरू होती. याप्रकरणी खडकी येथील बॉम्बे सेपर्समधील एका कर्मचाऱ्यासह सहा जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

कारवाईत नवीन दोन हजार आणि पाचशे रुपयांच्या बनावट नोटा भरलेले बॉक्स आढळून आले. मात्र, या नोटा खेळण्यात वापरण्यासाठी छापल्या असल्याचे त्यावर नमूद केले होते. परंतु बाजारातील चलनी नोटांसारख्याच त्या दिसत असल्याचे पोलिसांनी सांगितले. यातील एक व्यक्ती बॉम्बे सॅपर्स डेपो बटालियन खडकी येथे नाईक या पदावर काम करत असल्याची माहिती समजते. याबाबत उपनिरीक्षक नीलेश कुमार महाडिक यांनी फिर्याद दिली आहे. रात्री उशिरापर्यंत विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीत मुंबई व पुण्यातील लोकांचा समावेश आहे.

पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, लष्कराच्या गुप्तचर विभागामार्फत पोलिसांना याची

**लष्कर गुप्तचर विभाग आणि गुन्हे शाखेची संयुक्त कारवाई**

माहिती मिळाल्यानंतर सहपोलीस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी उपायुक्त बच्चन (पान २ पहा) ▸▸

**Prabhat 12.06.20**

# जबरी चोरी करणारा सराईत खडकीत जेरबंद

खडकी, दि. ११ (प्रतिनिधी) - चारचाकी, दुचाकी गाड्या चोरून त्या गाड्या वापरून चोरीचे गुन्हे करणाऱ्या सराईतास खडकी पोलिसांनी जेरबंद केले. आठ महिन्यांपासून तो फरार होता.

अंकल उर्फ सुशांत जॉन पंडित (वय ३२,रा.सैनिक हैसिंग सोसायटी,औरंगाबाद, सध्या, पिंपळेगुरव) असे त्याचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्याकडून तीन चारचाकी आणि तीन दुचाकी वाहने असा १३ लाख ७० हजार रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. दि. २९ ऑक्टोबर २०१९ला सुशांत सहाय यांच्या कैबला तवेरा गाडी आडवी लावून त्यांच्याजवळील ७९,००० रुपयांचा ऐवज चोरी करण्यात आला. या गुन्हाचा तपास खडकी पोलीस करत असताना हा गुन्हा शाहीद सिराज कुरेशी, लाली शेट्टी, सन्नी प्रवीण चिवे,अर्शद सय्यद, अंकल उर्फ सुशांत पंडीत, तरुण पिल्ले आणि इतर दोन अल्पवयीन बालकांनी केल्याचे निष्पन्न झाले. मात्र, अंकल हा फरार होता. दरम्यान, आरोपी खडकी बाजार येथे असल्याची माहीती पोलीस उपनिरीक्षक प्रताप गिरी आणि पोलीस नाईक किरण घुटे यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी अंकल याला ताब्यात घेतले.

**Prabhat 19.06.20**

# तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणारे दोघे जेरबंद

**पुणे,** दि. १८ - भवानी पेठ, कासेवाडीसारख्या कंटेन्मेंट झोन परिसरात गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या दोघांना गुन्हे शाखेच्या युनिट १ ने जेरबंद केले. त्यांच्याकडून १ लाख ७ हजार रुपयांचे तंबाखूजन्य पदार्थ, सिगारेट, गुटखा जप्त केला.

सादीक मेहमूद शेख (२८) आणि ऐयतेशाम निजामुद्दीन शेख (१८, दोघेही रा. भवानी पेठ) अशी दोघांची नावे आहेत. युनिट १ चे पोलीस नाईक सचिन जाधव हे पेट्रोलिंग करत असताना त्यांना कासेवाडी परिसरात बेकायदेशिर गुटखा, तंबाखूजन्य पदार्थ, सिगारेट विक्री होत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरूण वायकर, पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड यांच्यासह त्यांच्या पथकातील कर्मचाऱ्यांनी सादीक आणि ऐयतेशाम या दोघांना ताब्यात घेऊन अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी आर. बी. कुलकर्णी यांना पाचारण केले.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही चंद्रकांत नारायण अस्वारे यांचे मालकीची हक्क ताबे वहिवाटीची असून सदर मिळकत ही त्यांनी ज्ञानेश्वर हारकु अस्वारे यांना खरेदी देण्याचे निश्चित करून तसा साठेखतानुसार विसार स्वीकारलेला आहे. सदर मिळकत पूर्णतः निर्वेध व निजोखमी असलेचा संपूर्ण भरवसा चंद्रकांत नारायण अस्वारे यांनी दिलेला आहे. तरी सदर मिळकत विक्री कामी व खरेदी खताकामी शासकीय परवानगीची आवश्यकता असल्यामुळे सदर परवानगीचे कामी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे कायदेशीर अर्ज करणार आहेत. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध अगर तत्सम स्वरूपाचा बोजा व इतर काहीही हरकत असलेस ही नोटीस जाहीर झालेपासून ७ दिवसांचे आत मुळ कागदपत्रांनिशी खालील पत्यावर समक्ष भेटून खात्री करून घ्यावी. अन्यथा ज्ञानेश्वर हारकू अस्वारे हे सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही.

**परिशिष्ट मिळकत :-** तुकडी पुणे, पोटतुकडी आंबेगाव येथील मे. दुय्यम निबंधक सो. आंबेगाव (घोडेगाव) यांचे हद्दीतील तसेच जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती आंबेगाव

**Prabhat 07.06.20**

# उमरग्यात खून करून पुण्यात राहणाऱ्यांना अटक

## गुन्हे शाखा युनिट चारची कामगिरी

**पुणे,** दि. ६ - शेतीच्या वादातून झालेल्या भांडणात उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्यामधील औराद गावात एकाचा खून करून पुण्यात आलेल्या दोघांना पाषाण सुस रोडवर सापळा रचून शुक्रवारी पहाटे गुन्हे शाखा युनिट चारच्या पथकाने बेड्या ठोकल्या. श्री मंगेश चौधरी (वय २०), सागर प्रकाश ढोकणे (वय १९, रा. दोघेही कर्वेनगर) अशी दोघांची नावे आहेत.

शेतीच्या वाटणीच्या कारणातून झालेल्या भांडणात व वडिलांच्या अपमानाचा बदला घेण्यासाठी पुतण्या अक्षय शेषेराव दुधभाते याने त्याच्या राहत्या गावातील दोन व्यक्तींसह श्री व सागर यांच्या साथीने चुलता दिगंबर दुधभाते (वय४०, रा. औराद, ता. उमरगा) यांना लाथाबुक्यासह काठीने गंभीर मारहाण करून खून केला होता. खुनानंतर आरोपी पुण्यात आले होते. याप्रकरणी उमरगा पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. खुनाचा मुख्य सुत्रधार अक्षय दुधभाते याला अगोदरच उमरगा पोलिसांनी अटक केली आहे. अक्षय हा पुण्यात वास्तव्यास असून, यापुर्वी देखील त्याच्यावर विविध प्रकारचे गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले.

दरम्यान, पोलीस निरीक्षक अंजुम बागवान, सहाय्यक निरीक्षक गणेश पवार, कर्मचारी सुनिल पवार, भालचंद्र बोरकर हे पथकासह बाणेर परिसरात गस्तीवर असताना, त्यांना आरोपी श्री व सागर ये दोघे पाषाण सुस रोडवर येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार दोघांना सापळा रचून ताब्यात घेतले. पुढील कारवाईसाठी त्यांना उमरगा पोलिसांच्या ताब्यात देण्या आले आहे.

पुणे पोलीस
Pune Police

Prevention of Crime

Mata 31.03.20

# खोट्या माहितीच्या आधारे प्रवास पास

**११ जणांविरुद्ध गुन्हा : सर्व अर्जांसाठी एकच आधारकार्ड, मेडिकल सर्टिफिकेट**



पुणे, दि. ३ - पुणे शहरातून इतर जिल्ह्यात जाण्यासाठी डिजिटल पास काढताना खोटी माहिती देणाऱ्या ११ जणांविरुद्ध बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला.

मंगेश कसळकर, प्रशांत मयेकर, सागर देवरुखकर, तेजस अनंत चेबुलकर, नरेश साबळे, राजू गुजर, स्वप्निल धनावडे, अनंत डीचलकर, योगो भोसले, सागर पवार, सिद्धेश सुवरे अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरांतर्गत तसेच शहरातून इतर जिल्ह्यात जायचे असल्यास डिजिटल पास असणे आवश्यक आहे. यासाठी नागरिकांना ऑनलाइन अर्ज करून योग्य ती कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. अर्जासाठी www.punepolice.in ही लिंक उपलब्ध करून दिली आहे. योग्य ती माहिती भरून कागदपत्रे जोडल्यानंतर पुणे पोलिसांमार्फत पडताळणी होऊनच परवानगी दिली जाते. परंतु, पाससाठी काही लोकांनी चुकीची आणि खोटी माहिती भरल्याचे पुणे पोलिसांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी तपासणी केली असता त्या सर्व अर्जांसाठी एकच मोबाइल नंबर तसेच एकच आधारकार्ड आणि मेडिकल सर्टिफिकेट जोडल्याचे समोर आले. अर्जदार हे मुंबई व ठाणे परिसरात राहणारे आहेत. त्यांना तेथून कोकण, सातारा, सांगली असे जायचे होते. परंतु, त्यांना मुंबई व ठाणे प्रशासनाकडून पास न मिळाल्याने त्यांनी शक्कल लढवली आणि मुंबई ते पुणे व पुणे ते त्यांना जायचे ठिकाण असा अर्ज करून आपण पुण्यात राहत असल्याची खोटी माहिती अर्जात भरली. हे सर्व पास ना मंजूर करत पोलिसांनी चौकशी करून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### गुन्हे शाखा युनिट दोनकडून तपास सुरू

डिजिटल पास देण्यासाठी उपायुक्त (गुन्हे) बच्चन सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक शिल्पा चव्हाण, सहायक पोलीस निरीक्षक स्वाती केदार, शानमे आणि आठ कर्मचारी काम पाहतात. त्यांच्या निदर्शनास ही बाब आल्यावर त्यांनी पडताळणी करून बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखा युनिट दोनचे पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप करत आहेत.

**Prabhat 07.06.20**

# ठाण्यातील दुहेरी हत्याकांड; आरोपीला पुण्यात बेड्या

## हॉटेल व्यवस्थापकाचा वेटरनेच केला खून

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ६ - ठाणे येथील एका हॉटेल व्यवस्थापकासह दोघांचा खून करणाऱ्याला स्वारगेट पोलिसांच्या मदतीने जेरबंद करण्यात आले. व्यवस्थापक स्वत:साठी चांगले, तर कर्मचाऱ्यांसाठी साधे जेवण मागवत होता. यावरुन चिडून वेडने हा खून केल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेनंतर आरोपीने भाजीपाला वाहतुकीच्या वेगवेगळ्या सहा वाहनांतून प्रवास करून पुणे गाठले. येथे तो नीलायम थिएटरजवळील एका हॉटेलमध्ये उतरला होता. मोबाइल फोनवरुन त्याचा माग काढण्यात आला.

कल्लू यादव ( ३४, मूळ उत्तर प्रदेश) याला हॉटेल साजनमधून अटक करण्यात आली. त्याने येथे यापूर्वी आठ वर्षे काम केले होते. वर्षभरापूर्वीच तो ठाण्यातील एका बारमध्ये कामाला लागला होता. ठाणे पोलिसांनी शुक्रवारी पहाटे शबरी फॅमिली रेस्टॉरंट आणि बार येथे दोघांचे मृतदेह पाण्याच्या टाकीतून बाहेर काढले होते. हेश शेट्टी (वय ४८) आणि नरेश पंडित (वय ५२) अशी या दोघांची नावे आहेत. एकजण रेस्टॉरंटमध्ये मॅनेजर होता, तर दुसरा वेटर होता. लॉकडाऊनमुळे रेस्टॉरंट बंद झाल्याने कर्मचारी त्याच इमारतीतील खोल्यांमध्ये थांबले. रेस्टॉरंट मालकाला एका कर्मचाऱ्याच्या आलेल्या कॉलवरुन माहिती मिळाली होती. हॉटेलमध्ये यादव नसल्याने पोलिसांना त्याचा संशय आला होता. पोलिसांनी त्याचा मागोवा घेतला असता, शेवटचे स्थान नालासोपारा उपनगराचे होते. त्यांनी मोबाइल लोकेशनद्वारे यादवला पुण्यात ट्रेस केले.

“

संबंधित आरोपी यापूर्वी पुण्यात काम करत असताना त्याच्यावर स्वारगेट पोलिसांत दोन गुन्हे दाखल आहेत. वर्षभरापूर्वीच तो ठाणे येथे गेला होता. तेथे खुन केल्यावर तो पुन्हा पुण्यात आला. ठाणे पोलिसांनी मदत मागितल्यावर त्यांच्या मदतीला कर्मचारी देऊन यादवला अटक करण्यात आली.

– ब्रह्मानंद नायकवडी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक

**Prabhat 16.06.20**

# तलवारीच्या धाकाने दुचाकी चोरणारे सराईत अटकेत

पुणे, दि. १५ - तलवारीचा धाक दाखवून तरुणाला मारहाण करीत दुचाकीची चोरी करणाऱ्या दोघांना विमानतळ पोलिसांनी अटक केली. त्यांचे दोन साथीदार फरार झाले. ही घटना लोहगावमधील जनार्दननगरमध्ये घडली.

दिनेश कांबळे आणि करण राखपत्रे अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी सनी गेचंद (रा. येरवडा) यांनी फिर्याद दिली. सनी आणि अजय हे प्रशांत जाधव या मित्रांसोबत किराणा दुकानासमोर पाणी पीत होते. त्यावेळी तेथे आलेल्या सराईत दिनेश, करण आणि इतर दोघा साथीदारांनी सनीला दमदाटी, मारहाण केली.

त्यानंतर टोळक्याने सनीकडून चावी घेऊन दुचाकी चोरून नेली. त्यानंतर पोलिसांनी माहिती काढून दिनेश आणि करणला ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी चोरीची कबुली दिली. याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक जुबेर मुजावर अधिक तपास करीत आहेत.

**Prabhat 16.06.20**

# दरोड्याच्या तयारीतील टोळी नऱ्हेत जेरबंद

पुणे, दि. १५ - नऱ्हे-धायरी रस्ता परिसरात दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या सात जणांच्या टोळीला सिंहगड पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून दोन दुचाकी, एक मोटार, मिरची पावडर, शस्त्रे, मोबाइल असा ५ लाख ८५ हजारांचा ऐवज जप्त केला. ही कारवाई रविवारी मध्यरात्री दीडच्या सुमारास केली.

रोहित प्रकाश पोकळे (२८, रा. गणेश पेठ), अमित धनंजय बोराटे (२५, रा. गुरुवार पेठ), भूषण रमेश मोहिते (३७, रा. धायरी), संदीप संजय दुबे (२५, रा. शुक्रवार पेठ), शुभम राजेश पवार (२५, रा. गणेश पेठ), सागर बाळासाहेब टिळेकर (२३, रा. गंजपेठ), अभिषेक संतोष पन्हाळे (२१, रा. गंजपेठ) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस नाईक सचिन तनपुरे यांनी फिर्याद दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास सिंहगड पोलीस हद्दीत गस्त घालत होते. त्यावेळी नऱ्हे-धायरी रस्त्यावर दोन दुचाकीवरील चौघेजण आणि मोटारीत बसलेले काहीजण पोलिसांना दिसून आले. त्यामुळे पोलिसांनी त्यांच्याकडे जाऊन चौकशी केली असता, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यांच्याकडील मोटारीची झडती घेतली असता, त्यामध्ये मिरचीपूड, घातक शस्त्रे, दोरी आढळून आली. त्यानुसार पोलिसांनी रोहित, अमित, भूषण, संदीप, शुभम, सागर, अभिषेकला ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी एका टेम्पोचालकाला अडवून मारहाण केल्याची कबुली दिली. नऱ्हे परिसरात दरोडा घालणार असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. टोळीला वेळीच अटक केल्यामुळे दरोडा टळला आहे. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक नितीन जाधव अधिक तपास करीत आहेत.